## MAHARASHTRA ACT No. LIX OF 1981

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION AND AMENDMENT) ACT, 1981

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २५ सप्टेंबर, १९८१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. धोत्रे,

सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. LIX OF 1981

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971 AND FURTHER TO AMEND THAT ACT, WITH RETROSPECTIVE EFFECT

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक २५ सप्टेंबर, १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

### सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९.

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची पूर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे व त्या अधिनियमात आणखी सुधारणा करणे यांसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७१ चा महा. ४७. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची पूर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे व त्या अधिनियमात आणखी सुधारणा करणे यांसाठी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी १४ ऑगस्ट १९८१ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) अध्यादेश, १९८१ प्रख्यापित केला;

१९८१ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल.

(२) तो, ३० जून १९८१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १, पोट-कलम (४) मध्ये "१९८१" या संख्येऐवजी "१९८२" ही संख्या दाखल करण्यात येईल. १९७१चा महा. ४७.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम २ ची सुधारणा. ३. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(अ) खंड (ड) "अधिलाभांश" हा शब्द ज्या दोन ठिकाणी येतो त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "जादा किंमत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) खंड (के) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(केए) "हरितपत्र" म्हणजे, प्रत्येक कापूस उत्पादकाला, तो ज्या प्राथमिक कृषि पत संस्थेच्या कार्यक्षेत्रात कापूस पिकवीत असेल त्या संस्थेकडून विहित नमुन्यात व विहित रीतीने देण्यात आलेले पत्र (मग तो त्या संस्थेचा सदस्य असो किंवा नसो) ;".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम २० ची सुधारणा. ४. (१) मुख्य अधिनियमाच्या कलम २० ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात येईल आणि अशा नव्याने क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर पुढील परंतुक शेवटी जादा दाखल करण्यात येईल :—

"तसेच, कापूस उत्पादक हा, कापूस उत्पादक सहकारी सूत गिरणीचा सदस्य असेल त्याबाबतीत, त्याला त्याने उत्पादन केलेला कापूस अंशत: किंवा पूर्णत: अशा गिरणीला देऊ करता येईल व विकता येईल. जेव्हा असा सदस्य गिरणीला कोणताही कापूस विकील तेव्हा गिरणीने सदस्यांस प्रारंभिक किंमत देणे बंधनकारक असेल व ही किंमत राज्य शासनाने त्या जातीच्या किंवा प्रतीच्या कापसाला हमी दिलेल्या किंमतीपेक्षा कमी नसेल, तसेच गिरणीवर, त्या जातीच्या किंवा प्रतीच्या कापसाला राज्य शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे अंतिम किंमतीपेक्षा कमी नसेल एवढे अंतिम प्रदान करण्याचे बंधन राहील. गिरणीस तिने अशा रीतीने संपादन केलेला जादा कापूस तिने दिलेल्या किंमतीस, राज्य शासनाला देऊ करता येईल व विकता येईल.".

(२) अशा रीतीने नव्याने क्रमांक दिलेल्या कलम २०, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(२) (अ) या कलमाच्या पोट-कलम (१) चे पहिले परंतुक किंवा कलम २१ यांमध्ये अन्यथा केलेली तरतूद खेरीज करून, कोणत्याही व्यक्तीला तिने पिकविलेला कोणताही कापूस तिला देण्यात आलेल्या हरितपत्राशिवाय कोणत्याही संचयन केंद्रावर देऊ करण्याचा हक्क असणार नाही किंवा अन्य व्यक्तीने पिकविलेला कोणताही कापूस, अशा अन्य व्यक्तीला दिलेल्या हरितपत्राशिवाय आणि कापूस अशाप्रकारे देऊ करण्यासाठी अशा व्यक्तीचे लेखी प्राधिकारपत्र प्रस्तुत केल्याशिवाय, तिच्यावतीने संचयन केंद्रावर देऊ करता येणार नाही.

(ब) ज्या शर्तींस अधीन ठेवून कोणत्याही व्यक्तीस हरितपत्र देता येईल आणि तिला ते वापरता येईल. आणि ज्या शर्तींस अधीन ठेवून ते निलंबन करण्यास किंवा रद्द करण्यास पात्र ठरेल त्या शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील ;

(३) कोणत्याही व्यक्तीने, एखाद्या संचयन केंद्रावर, तिने न पिकविलेला कोणताही कापूस तिला देण्यात आलेल्या हरितपत्रावर किंवा जिला हरितपत्र देण्यात आले आहे अशा व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीने पिकविलेला कोणताही कापूस दुसऱ्या व्यक्तीला देण्यात आलेल्या हरितपत्रावर दिला आहे. किंवा देण्याचा प्रयत्न केला आहे किंवा पोट-कलम (२) चे उल्लंघन करून कोणताही कापूस दिला आहे किंवा देण्याचा प्रयत्न केला आहे याबद्दल, सहकारी संस्थांच्या सहायक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची खात्री होईल तर, अशा अधिकाऱ्याला त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि अशा कापूस देणाऱ्याला त्याचे स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अशा कापूस देणाऱ्याविरुद्ध दाखल करता येईल असा कोणताही खटला किंवा इतर कार्यवाही यांना बाध न आणता, आदेशांद्वारे असे निदेश देता येतील की, अशाप्रकारे दिलेल्या किंवा देण्याचा प्रयत्न केलेल्या कापसाचा संपूर्ण साठा किंवा त्याचा कोणताही भाग आणि ज्यामध्ये असा कापूस आढळला असेल किंवा ठेवण्यात आला असेल अशी सर्व पार्सले, आच्छादने किंवा पात्रे आणि असा कापूस वाहून नेण्यासाठी वापरलेला प्रत्येक प्राणी, वाहन, जहाज, किंवा इतर वाहन, राज्य शासनाकडे जप्त करण्यात येईल. कापसाच्या अशा कोणत्याही साठ्यासाठी अशा कापूस देणाऱ्याला यापूर्वीच किंमत देण्यात आली असेल अशा बाबतीत, अशा अधिकाऱ्याला आदेशाद्वारे असे निदेश देता येतील की, अशा कापूस देणाऱ्याला किंमत म्हणून देण्यात आलेली रक्कम, त्याला असा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून दोन दिवसांत त्याने संचयन केंद्राला परत करावी आणि त्याने असे करण्यात कसूर केली तर त्याच्याकडून ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) खाली अधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही आदेशांमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही कापूस देणाऱ्याला, त्याला असा आदेश कळवण्यात आल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत त्या जिल्ह्याच्या सहकारी संस्था जिल्हा उप-निबंधकाकडे अर्ज करता येईल. अपील करणाऱ्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर असा उप-निबंधक त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, अपील करण्यात आलेला आदेश कायम करणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा त्याचे विलोपन करणारा आदेश देईल. अशा उप-निबंधकाचा निर्णय अंतिम असेल.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

सन १९७१ च्या महाराष्ट्र अधिनियम ४७ च्या कलम २४ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

"(२४) (१) पोट-कलम (२) अन्वये स्थापन केलेली कापूस समन्वय समिती, प्रत्येक कापूस हंगामाच्या प्रारंभी, कापसाच्या वेगवेगळ्या जातींसाठी किंवा प्रतींसाठी आणि आवश्यक असेल त्याबाबतीत, सरकी काढलेल्या कापसाच्या हमी दिलेल्या किंमतीची राज्य शासनाला शिफारस करील. राज्य शासन, कापूस समन्वय समितीच्या शिफारशीनुसार, कापसाच्या वेगवेगळ्या जातींसाठी किंवा प्रतींसाठी आणि, आवश्यक असेल त्याबाबतीत, सरकी काढलेल्या कापसाचीही हमी दिलेली किंमत **शासकीय राजपत्रात** आणि त्यास योग्य वाटेल अशा रीतीने अधिसूचित करील.

कापूस समन्वय समितीची स्थापना आणि हमी दिलेली किंमत निश्चित करण.

(२) राज्य शासन, एक कापूस समन्वय समिती नियुक्त करील. ती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(अ) सचिव, कृषि व सहकार विभाग (सहकार विभाग), महाराष्ट्र शासन ;

(ब) केंद्रीय कृषि मंत्रालय आणि केंद्रीय वाणिज्य मंत्रालय (वस्त्र निर्माण विभाग) यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी ;

३७२

(क) वस्त्र निर्माण आयुक्त ;

(ड) अध्यक्ष-नि-व्यवस्थापन संचालक, भारतीय कापूस महामंडळ, मर्यादित ;

(इ) महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी ;

(फ) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचा किंवा राज्य शासन या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी आपला एजंट म्हणून जिची नेमणूक करील अशा अन्य संस्थेचा एक प्रतिनिधी. ".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम २७ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मधील दुसऱ्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

"आणखी असे की, राज्य शासनाने किंवा त्याच्या वतीने किंवा कोणत्याही सहकारी सूत गिरणीने किंवा तिच्या वतीने एखाद्या सहकारी संस्थेला देय असलेली रक्कम म्हणून या कलमाखाली वजा केलेल्या कोणत्याही रकमेचे प्रदान कोणत्याही कारणाने लांबणीवर टाकण्यात आल्यास, राज्य शासनाकडून किंवा त्याच्या वतीने किंवा यथास्थिती सहकारी सूत गिरणीकडून किंवा तिच्या वतीने त्या संस्थेला अशा रीतीने वजा केलेल्या आणि त्या संस्थेला देय असलेल्या रकमेवर, रक्कम देय झाल्याच्या तारखेपासून तिच्या प्रदानाच्या तारखेपर्यंत, राज्य शासन, वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दरसाल दर शेकडा १० पेक्षा कमी नसणाऱ्या दराने व्याज देण्यात येईल.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम २८ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मध्ये, पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(२-अ) राज्य शासन, त्यानंतर कलम २२ अन्वये संचय केलेला कापूस, कलम २४, पोट-कलम (२) अन्वये स्थापन केलेली कापूस समन्वय समिती विनिर्दिष्ट करील अशा किंमतीने व अशा प्रमाणात, विक्रीसाठी खुला करण्याची व्यवस्था करील.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम २९ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

अंतिम किंमत ठरवणे.

"२९. (१) प्रत्येक कापूस हंगामानंतरच्या ३० सप्टेंबर नंतर लगेच किंवा (३० सप्टेंबरच्या आधीची किंवा नंतरची असू शकेल अशा) राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही तारखेनंतर लगच, राज्य शासन, सल्लागार मंडळाशी विचारविनिमय करून, उक्त कापूस हंगामामध्ये संपादन केलेली वेगवेगळ्या जातींची किंवा प्रतींची कपास किंवा सरकी काढलेला कापूस, याची अंतिम किंमत, विहित रीतीने ठरवील आणि ही अंतिम किंमत **शासकीय राजपत्रात** आणि त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने, अधिसूचित करील. अंतिम किंमत ठरवताना, लगतपूर्वीच्या कापूस हंगामात संपादन करून विकण्यात आलेल्या कापसाच्या गासड्या, सरकी काढलेला कापूस, कपास, सरकी आणि टाकाऊ कापूस यांच्या किंमती व ३० सप्टेंबर रोजी किंवा यथास्थिति विनिर्दिष्ट तारखेस, हाताशी असलेला साठा आणि कपासीची हाताळणी व तिची वटणी, सरकी काढलेल्या कापसाची हाताळणी व गासड्या बांधणी आणि कापसाच्या गासड्या, सरकी व टाकाऊ कापूस यांची हाताळणी यांवर झालेला एकूण खर्च, या गोष्टी विचारात घेण्यात येतील :

परंतु प्रत्येक जातीच्या किंवा प्रतीच्या कापसाची अंतिम किंमत काढताना, ३० सप्टेंबर रोजी किंवा यथास्थिति विनिर्दिष्ट तारखेस विल्हेवाट न लावलेल्या व हाताशी असलेल्या अखरच्या साठ्यांचे मूल्यनिर्धारण, हंगामात पूर्वी विकलेल्या अशा जातीच्या किंवा प्रतीच्या कापसाची सरासरी विक्रीची किंमत किंवा बाजार किंमत यापैकी जी कमी असेल त्या किंमतीनुसार करण्यात येईल.

(२) कोणत्याही विल्हेवाट न लावलेल्या साठ्याच्या पूर्ण किंवा अंशत: विक्रीनंतर, लगत-पूर्वीच्या कापूस हंगामात वसूल झालेली एकूण रक्कम, वरीलप्रमाणे ठरवलेल्या अंतिम किंमती-नुसार काढलेल्या एकूण रकमेपेक्षा अधिक होईल त्याबाबतीत, जादा रक्कम ही, किंमत चढउतार निधीमध्ये जमा करण्यात येईल, आणि ती त्यापेक्षा कमी असेल त्याबाबतीत, उक्त निधीत खर्च-खाती टाकून त्यामधूनच ती देण्यात येईल. विल्हेवाट न लावलेल्या साठ्याचा काही भाग नंतरच्या हंगामाच्या अखेरीस देखील पडून असेल त्याबाबतीत, साठ्याचा तो भाग प्रारंभीचा शिल्लक साठा म्हणून हिशेबात पुढे घेतला जाईल आणि मागील हंगामाचे निधीचे हिशेब निश्चित करून ते बंद करण्यात येतील.

(३) लेखा परीक्षेच्या परिणामी कोणतीही चूक आढळून येईल व समायोजन करणे आवश्यक होईल आणि अशा समायोजनाच्या परिणामी, वरीलप्रमाणे ठरवलेली अंतिम किंमत म्हणून काढलेल्या एकूण रकमेच्या संबंधात कोणतीही वाढ किंवा तूट आढळून येईल, त्याबाबतीत उक्त निधीमध्ये जादा रक्कम जमा करण्यात येईल आणि तुटीची रक्कम उक्त निधीत खर्चखाती टाकण्यात येईल व ती रक्कम निधीतून देण्यात येईल. ".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये,— १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम ३० ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "अंतिम किंमत व हमी दिलेली किंमत यांमधील फरकाच्या तीन चतुर्थांश रक्कम अधिलाभांश म्हणून देण्यात येईल." या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"अंतिम किंमत व हमी दिलेली किंमत यांमधील फरकाच्या पंचाहत्तर टक्के रक्कम जादा किंमत म्हणून देण्यात येईल;" ;

(ब) पोट-कलम (२) मध्ये, "एक चतुर्थांश शिल्लक रक्कम" या मजकुराऐवजी "पंचवीस टक्के रक्कम" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये,— १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम ३२ ची सुधारणा.

(अ) "अधिलाभांश म्हणून" या मजकुराऐवजी "आणखी जादा किंमत म्हणून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "अधिलाभांश म्हणून, वाटून देण्यात येईल." या मजकुरानंतर पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

"या अधिनियमाची मुदत समाप्त झाल्यानंतर, निधीतील शिल्लक रक्कम कापूस देणाऱ्या व्यक्तींमध्ये, विहित केलेल्या रीतीने वाटून देण्यात येईल.'' ;

(क) समासातील "अतिरिक्त अधिलाभांश" या मजकुराऐवजी "आणखी जादा किंमत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मधील पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

"(२) एक कोटी रुपयांचे प्रारंभिक अंशदान आणि कलम ३४, पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेले कोणतेही दायित्व पार पाडण्यासाठी निधीतील शिल्लक कमी पडेल त्याबाबतीत, त्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने निधीला वेळोवेळी दिलेले जादा अंशदान आणि कलम ३० पोट-कलम (२) अनुसार निधीमध्ये वेळोवेळी जमा केलेल्या रकमा यांचा मिळून निधी होईल :

परंतु पूर्वोक्त प्रमाणे निधीसाठी राज्य शासनाने द्यावयाचे जादा अंशदान, कलम ३५-अ खाली स्थापन

केलेल्या भांडवल उभारणी निधीतून भागवण्यात येईल आणि राज्य शासनाला त्याच्या परिणामी, उक्त निधीला, निधीच्या प्रयोजनार्थ गरज पडेल त्याप्रमाणे अतिरिक्त अंशदान, त्याबाबतीत रीतसर विनियोजन करून द्यावे लागेल.

(३) किंमत चढउतार निधीतील उपलब्ध रकमेचा विनियोग, किमान गुंतवणुकीचा पैसा (मार्जिन मनी) म्हणून किंवा योजनेच्या प्रवर्तनासाठी कलम ३५-अ खाली स्थापन केलेल्या भांडवल उभारणी निधीच्या इतर प्रयोजनांसाठी करण्यात येईल आणि त्यावर दरसाल दरशेकडा दहा या दराने किंवा राज्य शासन वेळोवेळी ठरवील अशा इतर दराने व्याज आकारण्यात येईल. हे व्याज योजनेच्या नफा-तोटा पत्रकामध्ये खर्ची टाकण्यात येईल आणि किंमत चढउतार निधीमध्ये जमा करण्यात येईल.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४, पोट-कलम (२) मध्ये,—

(अ) "फरकाच्या एक चतुर्थांश रक्कम" या मजकुराऐवजी "फरकाच्या पंचवीस टक्के रक्कम" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) "कलम ३० याच्या पोट-कलम (२)" या मजकुराऐवजी "कलम ३० याच्या पोट-कलम (१)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ यात प्रकरण 'सहा-अ' समाविष्ट करणे.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ नंतर पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :—

## "प्रकरण ६-अ

## भांडवल उभारणी निधी.

भांडवल उभारणी निधीसाठी तरतूद.

३५अ. (१) योजनेचे काम योग्य प्रकारे व सातत्याने चालावे म्हणून, अधिक निधी निर्माण करण्यासाठी, वेळोवेळी पत संस्थांकडून कर्जाऊ घ्याव्या लागणाऱ्या किमान भांडवलाची (मार्जिन मनी) किंवा साधारण भाग भांडवलाची तरतूद करण्याकरता, याद्वारे, भांडवल उभारणी निधी (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश "निधी" असा करण्यात आला आहे), या नावाचे एक स्वतंत्र खाते सुरू करण्यात येत आहे.

(२) राज्य शासन, याबाबतीत रीतसर विनियोजन करून, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) अधिनियम, १९८१ याच्या प्रारंभापूर्वी या निधीच्या प्रयोजनांसाठी त्याने पूर्वी दिलेल्या कोणत्याही अंशदानांसह, निधीकरिता ३१ मार्च १९८५ रोजी किंवा तत्पूर्वी, रु. २५ कोटी पेक्षा कमी नसणारी एकूण रक्कम वेळोवेळी अंशदान म्हणून देईल व प्रदान करील.

१९८१ चा महा. ५९.

(३) या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम २७ अन्वये वजाती करणारी बाजार समिती किंवा प्राधिकृत सहकारी संस्था अथवा व्यक्ती, कापूस देऊ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस रक्कम देतेवेळी, हमी दिलेल्या किंमतीच्या, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील (तीन टक्क्यांपेक्षा ती अधिक नसेल) इतके टक्के रक्कमही कापून घेईल; त्यांपैकी पन्नास टक्के रक्कम ही उत्पादकांचे निधीला अंशदान असेल आणि बाकीचे पन्नास टक्के रक्कम, कापसावर आधारित औद्योगिक सहकारी संस्थांच्या विकासासाठी त्यांनी द्यावयाचे अंशदान असेल आणि अशाप्रकारे कापून घेण्यात आलेली व वसूल करण्यात आलेली रक्कम राज्य शासन सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा रीतीने व अशा मुदतीत, निधीमध्ये जमा करील.

(४) कलम ४२ अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला कोणताही एजंट राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल त्याप्रमाणे, त्याला देय असलेल्या एजन्सी आकारांच्या टक्केवारीपेक्षा कमी नसेल (तीन टक्क्यांपेक्षा ती अधिक नसेल) इतकी रक्कम दरवर्षी निधीमध्ये अंशदान म्हणून भरील.

(५) निधी ज्या प्रयोजनांसाठी स्थापन करण्यात आला असेल त्याच प्रयोजनांसाठी त्याचा वापर करण्यात येईल. त्यामध्ये कलम ३३, पोट-कलम (२) च्या परंतुकात निर्देश केलेल्या प्रयोजनाचाही समावेश असेल; या निधीतील रकमांचा व्यवहार, राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा एजन्सीमार्फत केला जाईल.

(६) अंशदाने किंवा इतर उत्पन्न ज्या वेगवेगळ्या मार्गांनी मिळत असेल त्या वेगवेगळ्या मार्गांचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात येतील. आणि या अधिनियमाची मुदत समाप्त होतेवेळी निधीच्या जमाखाती असलेली रक्कम, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करील अशा रीतीने आणि अशा वजातींच्या (कोणत्याही असल्यास) अधीन राहून, शक्य असेल तेथवर, राज्य शासन, कापूस देऊ करणाऱ्या व्यक्ती आणि एजंट यांना त्यांच्या अंशदानाच्या प्रमाणात वाटून देण्यात येईल.

(७) कोणत्या रीतीने निधी ठेवण्यात येईल, त्यातील पैशांचा व्यवहार करण्यात येईल आणि त्यातून खर्च करण्यात येईल किंवा तो वापरण्यात येईल यांसह, निधीशी संबंधित अशा सर्व बाबींचे, याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे नियमन होईल.".

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४३, पोट-कलम (१) मध्ये "१९," या आकड्यानंतर "२०," हा आकडा समाविष्ट करण्यात येईल. — सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४७ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

१५. या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाला पूर्वलक्षी मुदतवाढ देऊन त्यात सुधारणा करण्यात आली नसती तर, १४ ऑगस्ट १९८१ पूर्वी, कोणत्याही व्यक्तीने केलेली जी कोणतीही कृती किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही गोष्ट अपराध ठरली नसती अशा कोणत्याही कृतीबद्दल किंवा अकृतीबद्दल कोणतीही व्यक्ती या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे दोषसिद्धीस पात्र ठरणार नाही. — व्यावृत्ती.

१६. शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, मुख्य अधिनियमाची दिनांक ३० जून १९८१ नंतर मुदत समाप्त होत होती. ती या अधिनियमाद्वारे त्या दिवसापासून ३० जून १९८२ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत पूर्वलक्षी प्रभावासह वाढविण्यात आली असल्यामुळे तो अधिनियम पूर्वी कधी समाप्त झाला होता असे मानण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेले त्याचे सर्व उपबंध हे, या अधिनियमाच्या कलम १५ च्या प्रयोजनांकरता असेल त्या व्यतिरिक्त सातत्याने अंमलात आहेत असे मानण्यात येईल. — शंकांचे निरसन.

१९८१ चा महा. अध्या. १२. — १७. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) अध्यादेश, १९८१ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. — सन १९८१ चा महा. अध्या. १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही (केलेली कोणतीही नियुक्ती, केलेला कोणताही नियम, काढलेला आदेश किंवा काढलेली अधिसूचना यांसह) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये केल्याचे किंवा यथास्थिती काढल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.